# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 16.11.2024** **वार – शनिवार**

---

**मतदान-लग्न**

वीस नोव्हेंबरला सर्वांनी मतदान करावं या आशयाचे संदेश लग्न सोहोळयापूर्वी वधु-वरांनी हातात घेऊन आवाहन करण्याचा सोहोळा काल पिंपरी-चिंचवड शहरात आयोजित करण्यात आला. यावेळी स्वीप मध्यवर्ती अधिकाऱ्यांनी मतदानाच्या शपथेचं वाचन केलं आणि उपस्थित नातेवाईक तसंच 3 हजारांहून अधिक पाहुण्यांनी मतदानाची शपथ घेतली. स्वीप मध्यवर्ती अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी मतदानाविषयी माहिती देऊन मतदान शपथेचं वाचन केलं तसंच सक्षम लोकशाहीसाठी मतदारांनी निवडणुकीमध्ये मतदान करणं आवश्यक असून त्याकरिता सर्वांनी मतदान करावं असं आवाहन केलं.

**बेघर-मतदान**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि निवडणुक निर्णय अधिकारी यांच्याद्वारे संयुक्तपणे पिंपरी इथल्या सावली निवारा केंद्रामध्ये मतदान जनजागृतीचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यावेळी मतदानाचा निर्धार करण्यात आला. बेघर स्त्री पुरुष रहिवासी पिंपरीतील सावली निवारा केंद्रात 24 खोल्यांमध्ये सुमारे 2 ते 4 वर्षांपासून तात्पुरते वास्तव्य करतात. त्यांना मतदानाचा अधिकार मिळावा यासाठी संस्थेचे अध्यक्ष हुसेन शेख आणि महापालिका प्रशासनानं लोकसभा निवडणूकीपूर्वी मतदानाची ओळखपत्र काढून दिली आहेत.

**मतदान**

पर्वती मतदारसंघातील ज्येष्ठ नागरिक चंद्रभान भन्साळी यांनी वयाच्या 104 व्या वर्षी गृहमतदानाद्वारे हक्क बजावला. निवडणूक निर्णयअधिकारी मनोजकुमार खैरनार यांच्या मार्गदर्शनाखाली पर्वती मतदारसंघात गृह मतदान प्रक्रिया सुरू आहे.

**प्रचार सभा**

चेतन तुपे आणि सुनील टिंगरे यांच्यामुळे उभ्या राहिलेल्या समस्या सोडवण्याची जबाबदारी महापौर म्हणून प्रभावी काम केलेल्या प्रशांत जगताप यांनी घेतली असून, त्यांना हडपसरच्या प्रतिनिधित्वाची संधी द्यायची आहे, असं आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज केलं. हडपसर मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार प्रशांत जगताप यांच्या प्रचार सभेत जयंत पाटील बोलत होते.

**<u>विंटेज</u>**

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं शहरात पहिल्यांदाच "भव्य विंटेज कार आणि बाईक रॅली आणि प्रदर्शनाचं" आयोजन आज रात्री करण्यात आलं आहे. ऐतिहासिक आणि दुर्मिळ कार तसंच बाईक प्रत्यक्ष पाहण्याची अनोखी संधी नागरिकांना यानिमित्त मिळणार आहे.

**<u>पेरण्या</u>**

पुणे जिल्ह्यात यावर्षी ज्वारी पिकापेक्षा मका, हरभरा आणि गहू पिकांच्या पेरणीखालील क्षेत्र वाढण्याचा अंदाज आहे. तर रबी हंगामात आतापर्यंत 45 टक्के क्षेत्रावरील पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. जिल्ह्यात रबी हंगामासाठी सरासरी दोन लाख 29 हजार हेक्टर क्षेत्र आहे. त्यापैकी एक लाख तीन हजार 186 हेक्टर क्षेत्रावर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. रबी ज्वारीच्या 56 टक्के क्षेत्रावरील पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. मक्याच्या पेरणीनं सरासरी ओलांडून 121 टक्के पेरा पूर्ण केला आहे. जनावरांना चाऱ्यासाठीही उपयोग होत असल्यामुळं मक्याच्या लागवडीखालील क्षेत्रात दिवसेंदिवस वाढ होत असल्याचं दिसून येत आहे.

**<u>नेत्रदान</u>**

नेत्रदान ही काळाची गरज असून असंख्य दृष्टीहीन बांधवांना याचा लाभ होईल, आपल्या मृत्यूनंतरही आपल्या डोळ्यांनी कोणीतरी जग पाहू शकतो असं नेहा जोशी फौंडेशनचे संस्थापक राहुल जोशी यांनी आज पुण्यात सांगितलं. नेत्रदान रुग्णाच्या मृत्यूनंतर केलं जातं त्यामुळे कुठलीही निशाणी किंवा व्रण रहात नाही. नेहा जोशी फाऊंडेशन, विभागीय अवयवदान समन्वय केंद्र यांच्याद्वारे "दृष्टि आणि दृष्टिकोन" या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते.

**<u>मांजरेकर</u>**

देशातील इतर कुठल्याही चित्रपटसृष्टीपेक्षा मराठी चित्रपटसृष्टी अधिक संघटित आणि सुव्यवस्थित आहे. त्यामुळे बदलत्या काळात मराठी चित्रपटांनी तीन कोटींमध्येच अनेक चित्रपट

करण्यापेक्षा, अधिक खर्चाच्या भव्य चित्रपटांचं ध्येय ठेवावं, असा सल्ला दिग्दर्शक आणि अभिनेते महेश मांजरेकर यांनी आज पुण्यात दिला.
दकनी अदब फाऊंडेशनद्वारे आयोजित पाचव्या डेक्कन साहित्य उत्सवाचं उद्घाटन करताना महेश मांजरेकर बोलत होते.

**<u>दीपोत्सव</u>**

त्रिपुरी पौर्णिमेचं औचित्य साधून नवचैतन्य हास्ययोग परिवार आणि चतु:शृंगी देवस्थान समितीद्वारे संयुक्तपणे भव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला. चतु:शृंगी मंदिराच्या प्रांगणात रचनात्मक पद्धतीनं प्रज्वलित केलेला दिव्यांचा लखलखाट पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. गेल्या अकरा वर्षांपासून हा दीपोत्सव करण्यात येतो.
दीपोत्सवाच्या माध्यमातून ताण-तणावाच्या अंध:कारातून बाहेर पडण्यासाठी हास्याचे दिवे प्रज्वलित करण्याकरिता हा उपक्रम राबवण्यात येत असल्याचं नवचैतन्य हास्ययोगचे मकरंद टिल्लू यांनी सांगितलं.

**<u>अभिव्यक्ति</u>**

अल्फा इव्हेंटसद्वारे आयोजित 'अभिव्यक्ती' या सांगीतिक कार्यक्रमाअंतर्गत पुणेकर रसिकांना सुमधूर, बहारदार सरोद वादन तसंच दिग्गज कलाकारांनी सादर केलेल्या भक्तीरसपूर्ण संत रचनांचा अनोखा स्वराविष्कार पुण्यात अनुभवायला मिळाला. युवा पिढीतील आश्वासक कलाकार इंद्रयुद्ध मजुमदार यांनी बहारदार सरोद वादन केलं तर पंडित संजीव अभ्यंकर, आनंद भाटे, पंडित रघुनंदन पणशीकर यांनी संत रचना सादर केल्या.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आकाश ढगाळ राहिल्यानं आज थंडी जाणवली नाही. उद्याही असंच हवामान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**<u>हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.</u>**